पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात मंथली इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राच्या माध्यमातून मंथली इनोव्हेशन चॅलेंज या उपक्रमाची निर्मिती करण्यात आली असून, त्याद्वारे विद्यार्थी, संशोधक, नागरिकांना उद्‌भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उत्तरे व समाधान सुचवण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली आहे. यासंदर्भातील सर्व माहिती विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

या उपक्रमांतर्गत दर महिन्याला एक विषय दिला जाईल. यावर विद्यार्थी, शिक्षक, तसेच नागरिक त्या संदर्भातील त्यांनी शोधलेले प्रश्न, त्यावर शोधलेला कल्पक पर्याय अथवा उत्तर, समाधान यांची माहिती भरू शकतात. यामुळे परिस्थितीकडे पाहण्याचा नवदृष्टिकोन विकसित होण्यास नक्कीच मदत होईल. या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांना स्टार्टअप स्थापन करणे व त्याद्वारे तंत्रज्ञानाचे समाज हिताकरिता प्रभावी हस्तांतरण करणे सोपे होणार आहे, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले आहे

पुण्यनगरी

# न्यू कॉलेजमध्ये बिंदुनामावली तपासणी

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक प्रवर्गातील शिक्षक भरतीवरील निर्बंध शिथिल झाले. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कक्ष विभागाच्या वतीने जिल्ह्यातील महाविद्यालयांचे बिंदुनामावली तपासणी शिबिर न्यू कॉलेज येथे झाले. शिबिरात २९ पैकी २३ महाविद्यालयांची तपासणी पूर्ण झाली. यासाठी विशेष कक्ष विभागाचे उपकुलसचिव पी. एस. पांडव यांच्यासह व्ही. एस. सोग्रम, व्ही. डी. अडगळे यांनी तपासणी पथकाचे प्रमुख म्हणून काम पाहिले. शिबिराचे नियोजन प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रबंधक एम. वाय. कांबळे, लॅब असिस्टंट चेतन पाटोळे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
17 DEC 2021 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिपायाची पोर आयएसएस परीक्षेत देशात पाचवी

वार्ताहर
मुरगूड

कागल तालुक्यातील मुरगूड येथील शिवराज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजची माजी विद्यार्थिनी रूपाली करणे ही आयएसएस परीक्षेत देशात पाचवी आली आहे. ती या परीक्षेत यावर्षी जिल्ह्यातील पहिलीच ठरली आहे. तिचे वडील माध्यमिक शाळेमध्ये शिपाई म्हणून कार्यरत आहेत.

आय.एस.एस. म्हणजेच भारतीय सांख्यिकी विभाग (आयएएस समकक्ष) या परीक्षेत यश संपादन करताना रूपाली करणे हिने देशात पाचवा क्रमांक पटकावला. तिची आई गृहिणी आहे. वडील शिपाई आहेत. घरात तीन भाऊ आहेत. घरची हलाखीची स्थिती असूनसुद्धा तिने आकाशाला गवसणी घालणारे यश मिळवले आहे. सध्या ती सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील डिस्कळ येथे राहत आहे.



दोन जुळ्या बहिणी रूपाली व दीपाली प्राथमिक शाळेपासूनच कायम अभ्यासात हुशार. दोघींनी अकरावी व बारावी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. त्यांचे उच्च माध्यमिक शिक्षण शिवराज विद्यालय ज्युनियर कॉलेज मुरगूड येथे झाले. सातारा येथील यशवंतराव चव्हाण कॉलेज येथे पदवीचे शिक्षण घेतले. पदव्युत्तर एम. एस्सी. संख्याशास्त्र हे शिवाजी विद्यापीठ येथे केले. रुपालीने आय.एस.एस. म्हणजे भारतीय सांख्यिकी विभाग परीक्षेत लखलखीत यश संपादन केले. तिच्या यशाबद्दल बी. आर. बुगडे, माजी प्राचार्य महादेव कानकेकर, उपप्राचार्य रवींद्र शिंदे, विज्ञान विभाग प्रमुख उदय शेटे यांनी अभिनंदन केले.

**जुळ्या बहिणी एकापेक्षा एक सरस!**

रूपाली व दिपाली या जुळ्या बहिणी. दोघींचीही हुशारी समान. दहावी बोर्ड परीक्षेत दोघींनीही समान ९३ टक्के गुण मिळवले. कायम अभ्यासात हुशार असणाऱ्या दोघींची शैक्षणिक वाटचाल समान झाली. समान शिक्षण करताना दोघीही एकमेकींच्या गुरू–शिष्य झाल्या. दोघीनीही संख्याशास्त्र पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण केल्याची माहिती दिली.